.                                                                 नियमित दिवाणी मुकदमा क्र.११४/२०१२
निशाण क्र. १२३ लगत

**पुढील उलट तपास वादी यांचा प्रतिवादी क्र. १,३,७,१२,२३,२४ तर्फे विधिज्ञ श्री. ए.ए.गोगटे, यांचेमार्फत शपथेवर सुरु—**

११. आमची वंशावळ कोठे लिहून ठेवली आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगितलेल्या वंशावळीबाबत माझ्याकडे तोंडी पुराव्याव्यतिरीक्त इतर पुरावा नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे तुकारामच्या वडिलांचे नाव देवू होते. देवूच्या वडिलांचे नाव मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, देवूच्या वडिलांना एकूण किती मुले होती हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या मुलांचे पुढे वारस कोण याची मला माहिती नाही.

१२. मी या दाव्यातील वादीने व प्रतिवादीने दाखल केलेली कागदपत्रे पाहिली आहेत. फेरफार क्र. १३१२ मध्ये नमूद महादेव धाकू घाडी हे माझे चुलते आहेत. ते माझ्या वडिलांचे सख्खे चुलत भाउ आहेत. धाकूच्या वडिलांचे नाव काय होते हे मला माहिती नाही. तुकाराम देवू घाडी व महादेव धाकू घाडी यांनी करून दिलेले गहाणखत मी बघितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचप्रकारचे गहाणखत दि. १५/०४/१९४७ साली विश्राम महादेव रावराणे यांना देवू बाबू घाडी, तुकाराम देवू घाडी व रामचंद्र येसू घाडी यांनी करून दिले होते. आता मला ते मूळ गहाणखत दाखवण्यात आले. ते बरोबर आहे. सदर गहाणखतातील मजकूर मी वाचून पाहिला होता त्याप्रमाणे बरोबर आहे. सदर गहाणखतावर रामचंद्र येसू घाडी याची सही आहे. आणि बाकिच्यांचे अंगठे आहेत. सदर गहाणखतास नि. क्र. १७८ देण्यात येते. तुकाराम देवू घाडी, देवू बापू घाडी व रामचंद्र येसू घाडी हे माझ्या माहितीचे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम देवू घाडी हे माझे वडिल, देवू बाबू घाडी हे माझे आजोबा आहेत. रामचंद्र येसू घाडी हे माझे चुलते असलेबाबत मला माहिती नाही. आमच्या घरी यशवंत व भास्कर नावाने आम्ही एकटेच आहोत. मी १९७६ पासून मुंबईस होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३/०२/१९७४ रोजी मी भास्कर ला एक पत्र लिहले होते. माझे व भावांचे संबंध चांगले होते. १९७४

रोजीचे पत्र मी मुंबईत काही कामानिमित्त गेलो त्यावेळी लिहले आहे. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्या पत्रामध्ये जे काही लिहले आहे ते मीच लिहले आहे. सदर पत्राच्या शेवटी माझे नाव आहे. सदर पत्रास नि. क्र. १७९ देण्यात येते. सदरच्या पत्रामध्ये भास्कर ची मुलगी मनिषा बाबत लिहले आहे. सदर पत्रातील अशोक, छबी, मंदा, उषा यांच्याशी माझे काय नातेसंबंध नाहीत. अशोक, छबी, मंदा, उषा ही भिकाजीची मुले आहेत हे मला माहिती नाही. भिकाजी हे तुकारामचे सख्खे भाउ आहेत हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी भिकाजीचे वारस, रामचंद्रचे वारस आणि लक्ष्मणचे वारस एकत्रात राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, भिकाजी, रामचंद्र, लक्ष्मण यांच्या वारसांना हिस्सा दयावा लागेल म्हणून मी त्यांच्याशी कोणताही संबंध नाही असे सांगत आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, भास्करने स्वत:च्या उत्पन्नातून ५० माड, २०० हापूस आंबा कलमे, ४० साग, १० कोकम, १०० सुपारी आणि ४०० काजू या झाडांची दावा मिळकतीमध्ये लागवड केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याकरीता शांताराम आणि अशोकने भास्कर ला मदत केली आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, दावा घर मिळकत मी स्वत: बांधली त्यामध्ये माझा १/४ हिस्सा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये मी स्वत: कधीही लागवड व सत्ववृध्दी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. २३ व २४ यांचा देखील हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण व भिकाजी यांचा हिस्सा डावलण्यासाठी खोटा दावा दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.१८/०९/२०१९. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.09.19 10:42:15 +0530